श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## •मासिक•

वर्ष १७] शके १८९९ श्रावण [अंक ५

बाबा बाबा निशिदिनि मना बोल रे बोल बाबा ॥
बाबा नामीं, कितितरि असे दिव्य जादू अथाग ॥



या बालिश्यं, त्यज शरण जा त्या न भूपा नबाबा ॥
या बाधा ना, तुज यमगृहीं आवयाचीं जनाचा ॥

नलनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ॥
क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका ॥ १ ॥
—शंकराचार्य

संपादकः—रामचंद्र वासुदेव घैसास

131

# अनुक्रमणिका


| विषय | | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| श्रीसाईलीला व तिचे कार्य | .... | ... | ... | ... | २०३ |
| श्रीबाबांवरील पद | ... | .... | ... | .... | २०७ |
| द्रौपदीचा धावा | ... | ... | .... | ... | २०८ |
| माझ्या साईभक्तांच्या आठवणी | .... | ... | ... | .... | २११ |
| पुरंदरे यांची कविता | | ... | ... | ... | २२२ |
| अनुभव | ... | ... | .... | ... | ४१ |
| शिर्डीवृत्त | ... | .... | ... | ... | २२३ |
| संस्थान वृत्त | ... | ... | ... | ... | २२४ |
| आढावा | ... | ... | .... | ... | |


## श्रीसाईभक्तांस विनंती

पुष्कळ भक्तमंडळींच्या पत्त्यांत फेरफार झाल्यामुळें त्यांना पोष्टांतून पाठविलेल्या उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका व प्रसाद न पोहचतां परत येतात. तरी कृपा करून त्यांनी आपले पत्ते फेरबदल झाल्यास ऑ. चिटणीस रा. रा. श्री. ना. खारकर, ३७ चर्ई रोड, ठाणें यांस कळवावें.

भक्तांनीं आपले अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरितां कृपाकरून खालील पत्त्यावर पाठवावेत. ज्यांना आपलें नांव प्रसिद्ध होणें नको असेल त्यांनी आपलें टोपण नांव व आपला पत्ता कळवावा म्हणजे तशी व्यवस्था होईल.

## वर्गणीदारांस विनंती

ज्यांनी चालू सालची म्हणजे शके १८६२ ची वर्गणी ३ रु. ६ आणे अद्याप पाठविली नाहीं, त्यांनीं कृपाकरून ती खालील पत्त्यावर मनिऑर्डरनें पाठऊन द्यावी अथवा व्ही. पी. करण्याचें सुचवावें, म्हणजे ३ रु. ९ आ. ची व्ही. पी. करणेंत येईल.


**रा. वा. घैसास, संपादक.**

लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नंबर २

गोखले रोड नॉर्थ; दादर, मुंबई १४.

श्री साईबाबा



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ॥
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्याऽनिशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः॥



श्रीसमर्थ

# ' श्रीसाईलीला व तिचें कार्य '

## खुलाशांचा पत्रव्यवहार

—:०:—

गेले अंकी हा संपादकीय लेख प्रसिद्ध करून हा प्रश्न धसास लाविला आहे व त्या बाबतींत भक्तांकडून येणारे खुलासे प्रसिद्ध करून निश्चीत धोरण ठरविणेंचे …विले आहे.

संपादक

श्री. संपादक, ' श्रीसाईलीला ' यांसी सप्रेम न. वि. वि.

' लीले'च्या गेल्या म्हणजे आषाढ १८६२ च्या अंकांत ' श्रीसाईलीला व …चें कार्य ' हें स्फुट प्रसिद्ध झालें आहे. त्याबाबत श्रीबाबा व त्यांचें कार्य याबद्दल

आपुलकी असलेला एक त्रयस्थ म्हणून मी माझे विचार आपल्यातर्फे श्रीबाबांच्या भक्तासमोर मांडूं इच्छितों. त्याचा जरूर विचार व्हावा.

(१) 'लीले'तील विषय निवडः—आपणां सर्वांचे ध्येय एकच असले तरी प्रत्येकाचा तें गांठण्याचा मार्ग व वैयक्तिक आवडी निवडी ही वेगळी असणारच. कोणाला तत्वज्ञान रुक्ष वाटेल तर कोणाला अनुभव शुष्क वाटतील! अशा प्रत्येकाकडून वेगळाल्या सूचना येणारच! त्यांतून मार्ग काढून सर्वांना खुष करणें कोणाही संपादकांना दुर्घट होऊन बसणार आहे. यांतील सुवर्णमध्य म्हणजे संपादक वर्गानें आपले ध्येय ठरवून त्या दृष्टीनें निवड करणें हें योग्य. या दृष्टीनें पहातां **श्रीबाबांचा महिमा प्रतिपादन करणें व भक्तांना आत्मोन्नतिप्रत मार्गदर्शन करणें हेंच श्रीसाईलीलेचें** ध्येय असावे व तदनुरुप विषय निवड करावी, अनुभवचर्चा अवश्य व्हावी! अनुभव हाच सर्व श्रेष्ठ आहे! पण अनुभव प्रतिपादनांत गुरुमहिमा वाढविण्या ऐवजीं गुरुनिंदेचे बीज त्यांत पेरलें जात नाहीं याची काळजी घेणें अवश्य आहे. उदाहरणादाखल आपण निर्देशित अंकांतील दोन अनुभव घेऊं. पहिला 'फकीराचे वेषांत बाबांचे दर्शनः— हा अनुभव भक्तिला व बुद्धिला चालना देणारा आहे. बाबांच्या परकायाप्रवेशासंबंधीं ज्यांना माहिती व अनुभव आहेत त्यांना त्यापासून कौतुक वाटेल, इतर भक्तानांही मार्गदर्शन होईल व त्रयस्थ चिकित्सकांनाहीं त्यांत विचारार्ह असें कांहीं आढळेल! पण दुसरा 'आजारपणांत बाबांची कृपा!' हा अनुभव या कसोटीस उतरूं शकत नाहीं. तो लिहिणाऱ्यांचे बाबांवरील प्रेम अतुल आहे व त्याबद्दल मला अत्यंत आदर आहे. मी स्वतः भाविक आहे. गुरुकृपेचे अनुभव आहेत. तरी पण असे सर्वच अनुभव प्रसिद्ध करून आपण गुरू महिम्यांत भर घालतों असें मला वाटत नाहीं! कारण या दुसऱ्या अनुभवांत जे रोगाचे व उपचारांचे वर्णन केलें आहे व त्यांत गूण आल्याचे दाखविले आहे या सर्वांचें केवळ वैद्यकीयदृष्टया समर्थन करतां येण्यासारखें आहे. तेव्हां 'उपचार पूर्ण वैद्यकीयदृष्टया असें शास्त्रोक्त झाले, त्यामुळें गूण आला, त्यांत गुरुकृपेचा संबंध कोठें येतो?' असा जर त्यावर एखाद्या चिकित्सकानें आक्षेप घेतला, तर तो सयुक्तीक खोडून काढणें जड जाहे. म्हणजे पर्यायानें आपण गेलो गुरुमहिमा वाढविण्यास पण फावलें मात्र गुरुनिंदकांचे! असा विपर्यास न होईल अशी खबरदारी अनुभवांची निवड करतांना घेणें हलीच्या काळीं अत्यंत अगत्याचे आहे 'लीले'कडे वरचेवर अनुभवाची मागणी होते म्हणून हा विषय मी जरा विस्तारपूर्वक हाताळला. त्यांत मला कोणालाही दुखवावयाचे नाहीं व अनुभव देऊं नयेत अशा मताचाही

नाही. फक्त अनुभवाची निवड गुरुमहिमा व भक्ति यांना पोषक अशी असावी—एवढीच माझी सूचना आहे

( २ ) जमाखर्च व मदत:—शेकडों रुपये देणारे व पै पैका देणारे दोघेहि आपआपल्या मनोभावनेनुरूप व ऐपतीनुसार मदत करणारे आहेत, त्यांत तर-तम-भाव ठेवण्याचें कारण नाही. पण नजीक तुलना करावयाची झाल्यास शेकडो रुपये देणारे हे धनाधीश असतात; गंगाजळी नेहमी वहाती असते; या ना त्या निमित्तानें हरहमेश त्यांच्याकडून पुण्यकर्में घडतात ! तेव्हां आपल्या मदतीचा व्यय कसा होतो याची काळजी करण्याचें त्यांना कारणच पडत नाही. म्हणून ' ब्रह्म अर्पण ' या मनोभावनेनें ते संतुष्ट असतात. याच्या उलट पै पैसा देणारे हे बहुशः आजच्या अटीतटीच्या व्यवहारांत हातीं पडेल त्यांतूनच श्रीचरणांवरील प्रेमाखातर पै पैका बाजूस ठेवून देणारे असतात. त्यांची गंगा अशी कधीकाळीं प्रसंगोपात्त प्रकट होते ! पुण्यकर्में करण्यास त्यांना क्वचितच मनात करतां येते, व्यवहार निस्तरतांच त्यांची नाकींनव येतात. तेव्हां अशा परिस्थितीत आपण दिलेला पै पैका सत्कार्यी खर्च व्हावा अशी त्यांची मनीषा असल्यास त्यांत वावगें असें कांहींच नाही. आणि याच विश्वासामुळें आपला पै पैका सत्कार्यी लागल्यानें कळेपर्यंत ते अधीर असतात. आतां प्रसिद्धीबाबत म्हणावयाचें तर मनुष्य मात्र प्रसिद्धीलोलुप आहे. मी सुद्धां स्वतः प्रसिद्धीलोलुप म्हणवीत नाही. पण माझ्या नांवानिशीं छापून आलेले लेख मात्र पुनः पुनः वाचतो. माझ्या लेखावरील माझें नांव तुम्ही गाळलेंत तर मला कसेसेंच वाटेल ! तीच गत वर्गणी व मदतदारांची ! मुळींच नांवनिशीवार यादी प्रसिद्ध झाली नाहीं तर कोणी आक्षेप घेणार नाहीं, व संस्थानच्या व पोष्टाच्या पावत्यावर ते निश्चिन्त स्वस्थ राहतील, पण इतरांची नांवें प्रसिद्ध होऊन आपलें नांव मात्र न आल्यास त्यांत कोणाहि साधारण व्यक्तीस वैषम्य वाटेल, व यांतच जर पूर्वग्रह दूषित ती व्यक्ति असेल तर प्रश्नच नाहीं. त्यांचें मग खुलासा प्रतिखुलाशानेंहि समाधान होणार नाहीं. पूर्वग्रह दूषित दृष्टि ठेवणें हें कोणाहि व्यक्तीच्या उन्नतीस जसें घातुक आहे, तसेंच तशी दृष्टि राहण्याची संधि देणें हेंहि चालकांस भूषणावह नाहीं. पक्षोपक्ष हे कोणत्याहि संस्थेंत असतातच ! पण सर्वांना संभाळून घेण्याची जबाबदारी सत्ताधीश पक्षावर विशेष असते. विरोधी पक्षाविषयीं आदरभाव ठेवल्यानेंच किंबहुना त्यांना आपल्या विश्वासांत घेतल्यानेंच संस्थेंत एकोपा नांदू शकतो.

' ऋणानुबंधाचिया गांठी । भाग्यें तुम्हां आम्हां भेटी ॥ '
धरूं परस्पर प्रेम पोटीं । सुख संतुष्टी अनुभवूं ॥ '

श्रीसाई सच्चरित १९।१५०.

या बाबांच्या आदेशानुरुप जर पक्षोपपक्षीय वागतील तर घरांतली कुळंगडी चवाठ्यावर न येता संस्थानच्या कार्यक्षमतेंत स्पृहणीय अशी भर पडेल ! श्रीबाबांचे भक्त म्हणविणाऱ्या सर्वांनी याचा अगत्य विचार करावा.

( ३ ) श्रीसाईलीलाः—'लीलेचे हल्ली वरचेवर निघणारे जोड अंक, त्यांची पृष्ठ संख्या, आंतील मजकूर व वर्गणीदारांची संख्या या सर्वांचा विचार करतां या बाबत कांहीतरी स्थिर योजना आखण्याची जाणीव तीव्र भासते. मला खालील योजना सुचत आहे.

अ ):—श्रीसाईलीला मासिक द्विमासिक करावें व विषयाची निवड सुबोध, आकर्षक व विवेचनीय असावी !

आ ):—भक्तमंडळी ' लीले'ची वर्गणी व शिरडी येथील उत्सवाप्रीत्यर्थ वेळोवेळी पाठविणेंची वर्गणी अशा निरानिराळ्या वर्गण्या भरतात व त्याकरितां उभयपक्षी पोस्टाचा खर्च निष्कारण वराच होतो. त्यापेक्षा सर्वांनी प्रत्येकी एकदाच वर्षाकाठीं किमानपक्ष ६ रु. सहा रुपये पाठवावेत. किमानपक्षी ६ रु. देणाऱ्यांना भक्तमंडळाचे सभासद नोंदवुन घ्यावेत, त्यांना साईलीला मोफत मिळेल व उत्सवप्रसादहि दरवेळीं पाठविले जातील अशी व्यवस्था व्हावी.

इ ):—ज्या कोणा भक्ताला एवढी वर्गणी भरणें परवडत नसेल त्याला ऐपतीप्रमाणें देणगी पाठविण्याची मुभा आहेच ! पण जर त्याला ' साईलीला ' वेगळी पाहिजे असेल तर ती वरीलप्रमाणें ' द्विमासिक ' स्वरूपांत टपाल हशीलसह १॥ रु. वार्षिक वर्गणीत मिळावी.

ई ):—श्रीसाईलीला निधि म्हणून एक वेगळा निधि काढावा. श्रीसाईलीला हे बाबांचें वृत्त आहे तिची सेवा ही बाबांचीच सेवा याची जाणीव ठेवून धनिकांनी या निधिस सढळ हातातें मदत करावी. तसेंच वरीलप्रमाणें भक्तमंडळाच्या सभासदांकडून येणाऱ्या वार्षिक रकमेपैकीं प्रत्येकी कांहीं ठराविक हिस्सा त्या सभासदांची वर्गणी म्हणून या लीला निधींत जमा व्हावी

उ ):—भक्तमंडळाच्या सभासदांची नोंद वर्षांतून दोन ठराविक महिन्यांत करावी उदाहरणार्थ जानेवारी ते जून या महिन्यांच्या दरम्यान जे सभासद होतील त्यांची नोंद जानेवारीपासून धरावी व जुलै ते डिसेंबर पासून होतील त्यांना जुलैपासुन सभासद

रावे. सभासद नोंदल्या महिन्यापासून वर्षाची वर्गणी अगाऊ वसुल करावी. सभासदाचें नवीन वर्ष सुरू होण्याच्या आधीं एक महिना त्यांना सूचनावजा पत्र जावें व दिलेल्या मुदतींत वर्गणी न आल्यास 'लीले'च्या एका अंकाची किंवा वर्गणीच्या पाव-तीची व्ही. पी. करावी व्ही. पी. परत आल्यास त्याचे सभासदत्वाचे सर्व हक्क रद्द करावेत, व पुनः सभासद होण्यास दोन रुपये जादा वर्गणीची अट ठेवावी.

मी ज्या संस्थेचा सभासद आहे तिचे सभासदत्व व मासिक या बाबत जी व्यवस्था साधारणपणें आहे तिच्याच आधारावर मी वरील योजना सुचविली आहे या योजनेने ' लीला ' नियमित व स्वल्प खर्चांत निघूं शकेल असा माझा समज आहे

असो याप्रमाणें माझे विचार मीं स्पष्टपणें मांडले आहेत. श्रीबाबा भक्तांस त्यांचा न्याय तो विचार करण्याची प्रेरणा देवोत अशी प्रार्थना करून आटोपते घेतो. जयदत्त !

लोभवृद्धि व्हावी ही विनंति

पुणे आपला

९–७–४० सुमन सुंदर

# श्रीसाईसमर्थ

## राग–कलिंगडा — ताल–दीपचंद.

हमतो शरण चरणमें तुम्हारे, साई शिरडीके रहनेवाले ॥ ध्रु० ॥
तुमको कहते बाबासाई, सबको अघटीत माया दिखाई ॥
तुमने पानीके दीपक उजाळे, साई शिरडीके रहनेवाले ॥ १ ॥
साई अजब है तुम्हारी रचना, सुधरा, रोगी, अभक्त दिवाना ।
अपने भक्तोंके भवबंध खोले, साई शिरडीके रहनेवाले ॥ २ ॥
तुमको शरण जो कोई आया, उसका सबही दुःख मिटाया ॥
अपने बच्चोंके तरह संभाले, साई शिरडीके रहनेवाले ॥ ३ ॥
कभी छोडा न अपना ठिकाना, फिरभी घटघटकी बातोंको जाना ॥
अपने सेवक चुनचुनके निकाले, साई शिरडीके रहनेवाले ॥ ४ ॥
सुनो, सुनले अर्जी हमारी, हमको हैराण करते षड् वैरी ॥
भक्ती रसके पिलादो प्याले, साई शिरडीके रहनेवाले ॥ ५ ॥
गुरुदास कहे बाबासाई, मागूं सद्गुरु सेवा मिठाई ॥
तुमहो स्वामी दयाळू अकेले, साई शिरडीके रहनेवाले ॥ ६ ॥

D. V. S.

# द्रौपदीचा धावा.

येई धावत कृष्णाबाई । अति कनवाळे । निजजनमनसरसि मराळे ॥ धृ० ॥

हा मेला खळ दुर्योधन । कुळ बुडवाया । कुरुकुलात आला उदया ॥ दुर्बुद्धि दे मामा । बुद्धि फिराया । कर्णादिक श्रवण हराया ॥ कौरवासी गौरव रौरव—। गती कराया । धरली मति शुद्ध मराया ॥

॥ चाल ॥ एकत्र होऊनी यांनीं । प्रेरिला अनुज अघखानी । यानें अघटित केली करणी । कचे धरोनी । ओढित मजला । सभेंत आणिले ॥ अति कनवाळे । निजजन० ॥ १ ॥

दुःशासन धरुनी वेणी । ओढुनी पाडी । फरफरफर सभेंत ओढी ॥ वाग्धनुष्य योजुनी । वचनशरातें सोडी । अंतर्गत काळिज फोडी ॥ अर्धांगी बसुनी मांडीवर । म्हणतो जोडी । भर्त्याची ममता सोडी ॥

॥ चाल ॥ दासी ही दासि वदताहे । धर्मज्ञ गुरू बसलाहे । भीष्महि उगा तळीं पाहे । विदुरादिक मतीची गतिही । किमपि न चाले ॥ अति कनवाळे । निजजन० ॥ २ ॥

स्वस्त्री हरुनी आजी । युधिष्ठिर झाला । अतिं दीन कसाबी नृपाळा ॥ नागायुत बळि हा । भीम पराक्रमी असला । धर्माज्ञा-पाशीं फसला ॥ अर्जुनही न वदे कांहीं । उगाचि बसला । का ईश्वर मजवर रुसला ॥

॥ चाल ॥ हा अंध वृद्ध मामंजी । तोही किमपि न बोले माजीं । अवकळाहि दुष्ट समाजीं । अजुनी या अंत पाहसी किती । परमकृपाळे ॥ अति कनवाळे । निजजन० ॥ ३ ॥

चांडाळें आज्ञा दिधली । वसन हराया । तडतडतड झोंबत शरिरा या ॥ होताचि नग्न असुत्याग । करिन यदुराया । मग यावे प्रेत वधाया ॥ हा यवन जसा कीं धरी । गोवधा कराया । वृक व्याघ्र मृगांते खाया ॥

॥ चाल ॥ कृष्णाई धाव गे आई । तव बहिण म्हणती सखे बाई । ये त्वरा करुनी चतुराई । हें दीनबंधुब्रीद जाऊं पाहतें सगळें ॥ अति कनवाळे । निजजन० ॥ ४ ॥

मजवरि तव मानस होतें । कसें कृपाळे । तें ममत्व काजि लपावें ॥ मी व्यर्थचि कीं या भगिनी । ऐसे वदले । तूं ब्रम्ह तुजसि मी न तुळे ॥ लाजोनि मनांतनि हितगुज । असलें कळलें । मी स्वसा न तुझी जगपाळे ॥

॥ चाल ॥ वदने ते नव्हेचि लटिक । दासांची लढानशी चटीक । जाणोनी रक्षावे अटक । न पडावी तिळभरी नष्टें वसना धरिले ॥ अति कनवाळे । निजजन० ॥ ५ ॥

अनंता अपारा । अपरिमिता श्रीरंगा । ये चुकवी खलभयभंगा ॥ १"

श्रीधरा मुकुंदा । मुनिमनमानसभृंगा । प्रकटे मम अंतररंगा । गोविंद कृष्ण केशवा । भवाब्धितरंगा । नसले नाहीं दुःसंगा ॥

॥ चाल ॥ हे मुरमर्दन कंसारी । मंदरध- -वरा समय अति भारी । अशि करुणा ऐकुं

गेळ- बाबा दिव- साराववर्षांचे झाल्यास मी तें बाबाशी फार बोलत नसे. दीक्षित वगैरे मला माहे

धावुनि आली । निजरक्षणार्थ अवतरली ॥ ही मायबहिण कृष्णाई दयाळू असली । निजरक्षणार्थ अवतरली ॥ ६ ॥

तें प्रथमवसन सोडिलें । खलें करानें । दुसरें पाहे अवधानें ॥ तें फरफर तेव्हां ओढित । दोन्ही करानें । निधताती बहुविध वसनें ॥ पातालमृत्यु स्वर्गातिल । बहु हस्तानें । प्रभु नेसवीत सन्मानें ॥

॥ चाल ॥ कृष्णातळु ही रत्नाकर । निघताती अनंत अंबर । उपसितसे टिटवी खळकर । तो विटला नेत्रीं भरभर भोंडी भरली । धावुनि आली । दयाळु असली । निजरक्षणार्थ अवतरली ॥ ७ ॥

चावुनी अधर सरसावुनी । आला जवळीं । देखिली कशी पांचाळी ॥ लखलखित पीत वसन तें । चतुर्भुज चाळी । अवलोकिली सर्व नृपाळीं ॥ गंगात्मजभीष्म विदुर । दे टाळी । चांडाळमुखश्री काळी ॥

॥ चाल ॥ तो भीष्म म्हणे फिर नष्टा । विदुरही वदे पापिष्ठा । जळशील उभाचि रे भ्रष्टा । ही देवनाथ माउली । दयाळू खिजली । धावुनी आली ॥ निजरक्षणार्थ अवतरली ॥ ८ ॥

S. N. K.



# माझ्या श्री साईभक्तांच्या आठवणी

लेखांक ५ वा.

## श्री माधवरावजी देशपांडे उर्फ श्री साईबाबांचें शामराव.

प्रो:—ग. गो. नरके, एम्. ए.; एम्. एस. सी.

" तरीच जन्मा यावें । दास विठ्ठलाचें व्हावें "

श्रीतुकाराम.

श्रीमंत केशवराव भय्यासाहेब बुटी यांना शिरडींहून चि. नाथ माधवराव यांचें पत्र आलें. त्यांत मागील गुरुवारीं ता. २५ एप्रिल, चै. कृ. ४ शी, शके १८६२ ला शिरडी येथें आपले राहते घरीं माधवरावजी देशपांडे श्रीसाईचरणीं लीन-कैलासवासी—झाल्याचें वर्तमान वाचून मनांत त्यांच्या सर्व आठवणी जागृत झाल्या. त्यांतील कांहीं लिहून श्री साईलीला मासीकाचे वाचकांस सादर करीत आहे.

श्रीयुत कै. माधवरावजींचें नांव माहित नाहीं असा श्री. साईभक्तांत एकहि आढळावयाचा नाहीं. इ. स. १९१३ चे एप्रिल महिन्याचे २९ तारखेस मी प्रथम शिरडीस गेलो तेव्हां तेच मला द्वारकामाईत पुजेचें साहित्य घेऊन श्री. बाबाकडे घेऊन गेले. " बाबा ! हे पहा कोण आले. हे बापुसाहेब बुटींचे जावई " " यांना ओळखल का ?" बाबा म्हणाले " अग जाय रांडे. मी याला तीस जन्मापासून ( पिढ्यापासून ) ओळखतो अन् मोठा आला आहे, आतां ओळखल का म्हणून विचारायला " श्रीबाबा माधवरावजींशीं बालत असत तसे इतरांशी बोलतांना दिसले नाहींत. हें मला प्रथम दिवसापासूनच दिसून आलें. श्रीबाबांना नवकी कांहीं विचारावयाचें झाल्यास मी तें माधवरावजींचें मार्फतच विचारीत असे. मी स्वतः श्रीबाबाशीं फार बोलत नसे. कारण बाबांचे महान भक्त कै. बापुसाहेब बुटी व काकासाहेब दीक्षित वगैरे मला माझे

वडिलाप्रमाणें होते, व जुन्या पिढीचे आम्ही, मर्यादेमुळें वडिलांचे समोर फार बोलत व बसत नसूं. लवकरच माझें लक्षांत आलें कीं, माझे प्रमाणेंच इतर भक्तहि श्रीबाबांसमोर आपली विनंती श्री. माधवरावजींचेच मार्फत मांडीत असत. माधवराव गांवीं नसले किंवा वेळेवर मशीदित नसले म्हणजे इतर लोकहि [ पण त्यांतहि कांहीं ठराविक मंडळीच असे ] श्रीबाबांशी बोलत परन्तु त्यावेळीं श्रीबाबांचे उत्तरांत फरक असे. माझेच संबंधानें एकदां असें झाले कीं, माझे नोकरीचा प्रश्न निघाला. माधवराव हजर नव्हते म्हणून डॉ. पिल्लेंचे मार्फत बोलणें केलें. तात्पुरता ब्रह्मदेशचे नोकरीचा प्रसंग होता. बाबा म्हणाले " ब्रह्मदेशांत जावें " " ब्रह्मदेश आपल्याच आहे " डॉ. पिल्लेनी विचारले " बाबा ! ब्रह्मदेशाची नोकरी चांगली आहे ना. हे तेथें कायम होतील ना " बाबा म्हणाले "होय" त्यावरून सर्वांचा अंदाज झाला कीं मला [ नरकेला ] ब्रह्मदेशची नोकरी लागेल व ती कायम होईल. आतां ह्यापूर्वीच बाबांनी मी पुण्याला कायम होईन असें सांगून ठेविलें होतें. बिन्हाडीं परत आल्यावर माधवरावजींना व इतर मंडळींना ही हकीकत सांगितली. आम्हांला थोडें आश्चर्य वाटलें. माधवरावजी मला बाबांकडे पुन्हा घेऊन गेले. त्यावेळीं डॉ. पिल्लेहि तेथें बसले होते. माधवराव म्हणाले " कायरे देवा ! [ माधवरावजी बाबांशी प्रेमानें एकेरीहि बोलत ] कोणतें खरें. तूं मला सांगितलेलें खरं कीं भाऊला [ डॉ. पिल्लेना बाबा "भाऊ" म्हणत ] सांगितलेलं खरं. " बाबा म्हणाले तुला सांगितलेलं खरं. डॉ. पिल्लेनी तोंडावर हात ठेऊन हंसत हंसत विचारिलें " बाबा मला सांगितलेलं खरं, कीं आतां माधवरावांना सांगितलेलं खरं ? " बाबा म्हणाले " शाम्याला सांगितलेलं खरं. " मला विचार पडला कीं हें काय गूढ आहे. आहे त्यांत रहस्य आहे. तें ह्या लेखांत उकलण्याचा प्रयत्न मी करीत आहे.

माधवरावजी शिरडीत अत्यंत उपयोगी मनुष्य होते. श्रीमंत बापुसाहेब बुटी व नाशीकचे वकील रावबहादूर भाऊसाहेब धुमाळ हे शिरडीस प्रथम गेले ते वेळी दर्शन घेतल्यावर श्रीबाबांनी त्याना चावडीत जाऊन बसण्यास सांगितलें. थोड्या वेळानी त्यांना बापुसाहेब बुटी व धुमाळ यांजकडेस पाठविलें. तीच श्रीमंत बापुसाहेबांची व माधवरावांची प्रथम भेट. धुमाळ वकील बापुसाहेबांचे अगोदर शिरडीस जात येत असत. बापुसाहेबानी " हे कोण " म्हणून विचारिलें. त्यावेळीं धुमाळानी त्याना सांगितलें की " हा शिरडींतील अत्यंत उपयोगी मनुष्य आहे " हे " अत्यंत उपयोगी " विशेषण माधवरावजींना अगदीं बरोबर लागू होतें. पुढे माधवरावजींचा व माझा फारच परिचय झाला. ते आम्हाला कुटुंबातील वाटत. माधवरावजी शिरडीत नसले म्हणजे अगदी चुकल्या चुकल्या प्रमाणें वाटत असे. कारण त्यांचेमार्फत श्रीबाबांचे स्पष्ट आशिर्वाद

मिळत त्याप्रमाणें इतर कोणाच्याहि मार्फत मिळत नसत.

खेड्यांतील एक भिक्षूक वृत्तीतील कुळांतला ब्राह्मण, परंतु श्री. माधवरावजींचे तोंडावर शहरांतील शिकल्या सवरलेल्या माणसाप्रमाणें तेज खेळत असे. श्रीबाबा सर्व कांहीं गूढार्थानें बोलत. अत्यंत निकटच्या सहवासामुळें बाबांचे बोलण्याचा अर्थ यांना लागत असे तसा दुसऱ्या कोणालाही उलगडा करतां येत नव्हता. बाबांच्या कितीतरी गोष्टी ते नेहमी सांगत असत, ते बाबामयच झाले होते. नेहमीं मुखानें 'सांईनाथ' 'सांईनाथ' 'सांईनाथ' असा जप करीत असत. देवाशी फारच सलगीनें वागत. असत बाबा कितीही कातावलेले असोत—फिराट्ट झालेले असोत माधवरावजी त्यांचेजवळ निर्धास्त-पणें जात, चिलीम भरून देत व युक्तीनें चार बोलून शांत करीत.

सर्व जग ह्यांना " माधवराव " या नांवानें हांका मारीत. परंतु श्री. गुरुमाऊली ह्यांना " शामराव " म्हणत याचा उलगडा व्हावा म्हणून आम्ही पुष्कळ प्रयत्न केला परंतु कांहींच थांग लागला नाहीं. त्यांचें संबंधाचीं मागील जन्माची एकादी हकीकत माझे कानावर आली नाहीं.

माधवरावजींना मी फार खोदखोदून विचारीलें. माधवरावजींचे श्री बाबांशीं इतकें सलगीचे वागणे, बोलणे, त्याना वागविणे याचा मला उलगडा करावयाचा होता. माधव-रावजीशी बाबा वागत, तसें इतराशी वागत नसत हे तर उघडच दिसत होतें. माझाही माधवरावजीशी गाढ परिचय होताच मी त्यांना त्यांचे अनुभव विचारिलें. श्रीबाबा कोण, काय, त्यांची लीला कशी, ते काम कसे करीत असतील, आपली माणसे खोजून खोजून कसकशी आणीत असतील याचा मला अंदाज करावयाचा होता व तो मी केलाही आहे. परंतु माझे विचार ते माझे एका पामराचे विचार. ते चुकीचे असण्याचा बराच संभव आहेत. श्रीगुरुमाऊलीची मला पुष्कळ समजाऊन दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचे वर्णन माझे मते या जगात गूढ असे कांहींच नाहीं, फक्त आपणास कांहीं गोष्टींचा उलगडा होत नाही. सर्व गोष्टींचा उलगडा व्हावा, भ्रम कोठेही नसावा, अंदाजी घोडे उडवू नयेत. सत्य पूर्णपणें अनुभवास यावें हा तर सृष्टीचा उद्देश दिसतो. त्यात आपले बुद्धीसर्वस्व खर्च करून ज्ञान मिळविण्याचे खटपटीत असावें व ज्ञानानंद भोगावा हा तर परमार्थाचा पहिला पायंडा दिसतो. हे सर्व लक्षांत घेऊन मी माधव-रावजींना खोदखोदून विचारीलें. त्यानी आपली हकीकत—अनुभवाची सांगितली. ती अशी:—

13

लहाणपणीच शिरडी गावांत येऊन राहूं लागल्यावर श्रीबाबा माझे नजरेस आले. श्रीबाबांचे व माझे वयांत २०।२५ वर्षांचें अंतर असेल. बाबा मशीदींत बसत, मी ( माधवराव ) गावांत मास्तरकी वगैरे करीत असे. बाबा तंबाखूची चिलीम पीत असत. चिलीम पिण्याकरितांच कां होईना मी बाबाकडेस वारंवार जात असे. श्रीबाबांना गावांतील प्रमुख मंडळी पूज्य मानीत. तात्या पाटलाची आई, व त्यांचे घरची मंडळी, गोणकर मंडळी, म्हाळसापती सोनार, कुळकर्णी, वगैरे मंडळी त्यांना भजत व आपले गांवचा ' फकीर ' म्हणून त्यांचेवर फार लोभ करीत. त्यांतलाच मीहि एक झालो. पुढें काय झालें कोण जाणें. मला श्रीबाबांचेकडे जाण्यांत फार आनंद वाटूं लागला. त्यांचे जवळ असलें म्हणजे सात्विक भाव उमटावेत, अंग थरथरूं लागावें. डोळ्यांस पाणी यावें. माझेवर श्रीबाबांनी कांहीं प्रयोग केला असे मनाला वाटूं लागलें. श्रीबाबांची एक तऱ्हेची ओढ लागू लागली बाबांचे जवळ जाणें, बसणें फार होऊं लागल्यामुळें येणाऱ्या-जाणाऱ्या मंडळी संबंधानें विचारपूस स्वाभाविकपणेंच होऊं लागली. कोणी बाहेरगांवची ब्राह्मण मंडळी आली तर श्रीबाबाहि त्यांची बरदास्त ठेवण्यास मला सांगूं लागले. अशा मंडळींचें जेवण-खाण माझेकडेसच होऊं लागलें. बाहेरगांवचे मंडळींत माझ्या ओळखी पाळखी होऊं लागल्या. बाहेरगांवचे मंडळींचे आग्रहावरून मी त्यांचे गावीं जाऊं येऊं लागलों, श्रीबाबांना विचारूनच मी बाहेरगांवी जाणें येणें करीत असे. बाहेरगांवींहि एका-मुळें दुसरा अशा अनेक ओळखी होऊं लागल्या. चमत्कार असा कीं मी कोणा नवीन माणसाशीं बोलूं चालूं लागलों कीं ' याचा ( श्रीबाबांचा ) त्याचेवर गरका पडलाच. ' लोकांना ओढून आणण्याचें जसें कांहीं देवानें मला साधनच केलें, ही गोष्ट फार जुनी. त्यावेळीं माधवरावजी लहान होते. त्यांचे पाहण्यांत पुढील गोष्टी आल्या नव्हत्या. त्यांना बाबांनी मधाचें बोट खासच लावलें होतें. कारण पुढें बाळकराम मानकर यांचेवर जेव्हां बाबांचे प्रयोग झाले त्यावेळीं मी शिरडीस होतों म्हणण्या-ऐवजी मला बाबांनीं बोलावून नेलें होतें हें सांगणें जास्त सयुक्तिक दिसेल. त्यावेळीं बाळकराम संबंधानें बोलतांना माधवरावजींनी बाबांसमोर ' तूच यांचेवर कांहीं तरी टाकलें असशील ' असे उद्गार काढले होते. स्वतः तसला अनुभव घेतल्याशिवाय माधव-रावजींचे तोंडून खास निघाले नसते. या संबंधानें उहापोह करण्याचा माझा पुढें विचार आहे. तूर्त मला एवढेंच सांगावयाचें कीं माधवरावजी श्रीबाबांचे भक्तांतील एक प्रमुख होते. त्यांना बाबांनीं आपले कामी नेमले होते. माध्यान्हीची भिक्षा मागणाऱ्या कांहीं थोड्या मंडळींत ते होते असें सर्वांच्या नजरेस सहज भरणारें काम लोकांच्या चटका

लक्षांत येतें. परंतु सूक्ष्मांतल्या कामासंबंधानें अंदाजच करावा लागतो. हें असें होतें असा माझा खास समज आहे. बाबांचे सूक्ष्मांतील कामासंबंधानें, मी बरेच अंदाज करून पाहिले आहेत. बाकीचे अनुभव व अंदाज बाजूला ठेऊन ज्यांचे संबंधांत श्रीबाबांचे स्पष्ट वैखरीनें उच्चार निघाले तेच मी घेत आहे. दुसरें, अनुमानाचे सदरांत ठेऊन या संबंधांत चांगली खात्री झाल्याशिवाय ते वाचकांसमोर मांडित नाहीं.

कांहीं मंडळींना श्रीबाबांना खोजून आणायचाचे असते त्यांचेकरिता माधवरावजी सारख्यांची योजना होत असे असे मी आपले मत दिलें. परंतु दुसऱ्या कित्येकांना श्रीबाबांचे योजनेशिवायही माधवरावजी श्रीबाबांचेकडे आणीत कारण त्यासंबंधानें श्रीबाबाना त्यांचेवर रागवताना मी पुष्कळ वेळा पाहिले आहे. श्रीबाबा म्हणत " माझ्या अंगावर माणसे घालतोस " एखादे माणसाला काम सांगावे व त्यानें ते करून आणखीही दुसरे चांगले किंवा वाईट करावे त्याप्रमाणें हें दिसते.

माधवरावजीच्या हिंदुस्थानांतील सर्व यात्रा झाल्या होत्या. त्यांचा दीक्षित व बुट्टी यांचेशी फारच एकजीव झाला होता, दीक्षित यांचेशी कसा झाला हे त्यांनी स्वतः मला ह्या वर्षी रामनवमीचे उत्सवाकरिता मी शिरडीस गेलो होतो तेव्हां स्व–मुखानें सांगितलें आहे. कै. हरी सीताराम दीक्षित श्रीबाबांचे कडेस येऊ–जाऊ लागले. ते प्रथम श्रीबाबांचे परमभक्त कै. नानासाहेब चांदोरकर यांचेमुळें आले परंतु शिरडीस आल्यावर साहजिकच श्री. माधवरावजीचे मार्फत श्रीबाबांचेकडे जाऊन त्यांचेशी बोलत असत. एकदा काकासाहेब दीक्षित फारच गहींवरून आले व बाबानी " काय पाहिजे " म्हणून विचारिता विनवू लागले " बाबा आपला सहवास असावा " बाबानी उत्तर दिलें " ह्या शाम्याला किनई आपले जवळ असूं दे, म्हणजे मी जवळच आहे " ह्यानंतर काकासाहेब माधवरावजीना होता होई तो आपले जवळ ठेवीत. मुंबई–खांडवा–नागपूर वगैरे ठिकाणीं आपणाबरोबर नेत. त्यांना देवाप्रमाणें वागवीत. त्यांचे संबंधानें मन फारच मोठे राखीत. ह्यांत रहस्य आहे. श्रीबाबानी युक्ती केल्यामुळें त्यांना माधवरावजी जवळ असले म्हणजे तेथें अनायासे–लवकर जाता येत असे हे यावरून दिसते. श्रीमंत बापुसाहेब बुट्टींचीही माधवरावजीवर अशाच प्रकारची भक्ती होती. सांताक्रूझ येथें बापुसाहेब बुट्टींचा अंतकाल अगदीं जवळ एकदोन दिवसावर येऊन ठेपला होता. मी व माधवरावजी आम्ही दोघेही बापुसाहेबांचे अंतकालाचे वेळीं हजर होतो. त्याचे अगोदर वृत्ती थोडी सावध होती. तेव्हां त्यांनी, माधवरावजीना बोलाविलें " माधवरावजी असे जवळ या; आता तकलीफ सहन होत नाहीं. मला

वाटते बाबा लवकर पायाजवळ नेतील तर बरे. मी तुम्हाला चांगला जाणतो. तुम्ही जवळ असले म्हणजे पायाजवळ असल्यासारखे वाटते " हे बोलत असता बापुसाहेबांच्या डोळ्यातून अश्रुधारा चालू लागल्या. सद्गदीत झाले. त्यांनी माधवरावजींना श्रीबाबांचे ठिकाणी समजून त्यांचे पायावर डोके ठेविले.

बापुसाहेबांचे पश्चात् त्यांचे चिरंजीव श्रीमंत केशवराव भय्यासाहेब बुटी हेही माधवरावजींची तशीच बरदास्त ठेऊन त्यांचा ते चांगला मान राखीत. श्रीबदरी नारायणाचे यात्रेचे वेळी भय्यासाहेबानी माधवरावजींना शिरडीहून बोलावून आणून आपले बरोबर नेले. त्याना सन्मानाने वेळोवेळी घरी नागपूरला घेऊन जात. मरेपर्यंत त्यांना पेन्शनवजा थोडा दरमहा देत. अंतकाळची खबर मिळाल्यावर त्यांनी चि. नायाकडे देणगी पाठवून क्रिया वगैरे करण्याकरिता मदत पाठविली.

माधवरावजींना नाडी परीक्षा फार उत्तम असे. त्यांचे जवळ देशी औषधांचा बराच साठा असे. वैद्यकीवर त्याना पैसेही मिळत. इतर वैद्य व डॉक्टरानी हात टेकलेले रोगी यांनी बरे केले आहेत. मी एकदा माधवरावजींना विचारिले की आपण हे वैद्यकीचे ज्ञान कोठे संपादन केले. श्रीसाईबाबा औषधी गुटका सांगत. माधवरावजींचे मार्फतच नेहमी बोलणे होत असल्यामुळें त्याना सद्गुरु माऊलींचे मुखांतून निघालेल्या औषधाची तर माहिती होतीच. शिवाय श्रीबाबांची उदी. मी हा प्रश्न माधवरावजींना विचारीला तेव्हां त्यांचे जवळ त्याचे ओळखीचा एक ९० वर्षांचे घरात आलेला जवळचे खेड्यांतील मनुष्य येऊन बसला होता. त्याचे वय विचारीले परंतु त्याचे करिता विडा कुटावा लागला नाही हे पाहून मला फार आश्चर्य वाटेल. त्याचे दात फार मजबूत होते मी त्याला दात ह्या वयात इतके मजबूत असण्याचे कारण विचारिले त्याने व माधवरावजींनी मला त्यावेळी एका प्रयोगाची माहीती सांगितली. ती आता माझे लक्षात चांगलीशी नाही.

गाईचें दूधावर राहून अंधेरांत १५।२०।४० दिवस राहावयाचे असा तो प्रयोग होता व त्या शिवाय कांहीं वनस्पतीचें औषध घ्यावयाचे होते. त्यांचा हा प्रयोग श्री. मदनमोहन मालवीय यांनीं केलेल्या काया-कल्पाचे प्रयोगांसारखा दिसला. माधवरावजी मला सांगू लागले " आपण मला वैद्यकीचें ज्ञान कोठून मिळविले--" हे विचारिले, साईबाबाची कृपा तर खरीच. आम्ही ही माहीती अशा खेडवळांपासून मिळवितो व

तिचा संग्रह करतो. एकदां शिरडीस असतांना माझी दाढ फार दुखु लागली. मी फार अस्वस्थ झालो, कांहीं सुचेना. माधवरावजींनीं औषध दिले. अर्ध्या तासांत माझें दुःख बंद झाले. मला औषध सांगा. आता तुमचा वृद्धापकाळ झाला आहे. आपली जुनी माणसे अशीच. त्यांच्या युक्त्या त्यांजबरोबरच नाहींशा होतात असे मीं त्यांना परोपरीनें विनविले. पण त्यांनीं मला तीं युक्ती सांगितली नाहीं. शेवटी माझें एका मुलाला चि. बाळकृष्णाला त्यांनीं ते औषध सांगण्याचे कबूल केले व सांगितले. चि. बाळकृष्ण वैद्यकीचा अभ्यास करीत आहे असे सांगितल्यावर त्यांनीं त्याला ते दिले व कोणास सांगणार नाहीं व त्याचे मोबदला पैसा घेणार नाहीं असे त्याचेपासून वचन घेतले. औषध दीड दमडीचे आहे परंतु त्या वेळेपासून मला पुन्हां दंतवैद्याकडे Dentist कडे जाण्याचे काम पडले नाहीं.

माधवरावजी फार धोरणी व मुत्सद्दी होते. त्यांना बाबा पैसे देत नसत. युक्ती, उपाय, थोडी जमीन, साई भक्तांचे प्रेम व वैद्यकी यावर ते आपला प्रपंच थाटानें करीत, व आल्यागेल्याचाहि परामर्ष घेत असत.

माधवरावजी शरीरानें धिप्पाड व मजबूत होते. त्याना फारशी दुखणी वगैरे झालेली माझें पाहण्यांत नाहींत. त्यांचे सोवळे ओवळे सनातनी ब्राम्हणाप्रमाणे असे. कोठे चांगले ब्राम्हणी जेवणाखाण्याची व्यवस्था नसल्यास ते आपले हातानी आपला स्वयंपाक करून जेवीत.

त्यांना एकदां घरी सकाळीं स्नान करून पुजेचे सामान कोनाड्यांतून काढीत असता तेथें दडून बसलेला साप चावला. त्याचे पूर्वी कांहीं दिवस बाबा त्यांना " सांभाळ अंधारांत कोठे कोना कोपरांत हात घालू नकोस " असे सांगत होते. लगेच सापाचे विष अंगांत चढू लागून माधवराव घाबरे झाले. धावाधाव झाली. माधवराव विकळ होऊन त्याना दाही येऊं लागल्या. " मला मशीदींत एकदाचे गुरू माऊली समोर नेऊन टाका " असे ते सांगू लागले. मंडळीनीं त्यांना मशीदीचे मंडपांत आणले. त्यांना लगेच बाबा वर " फिराहू " झाले. " खबरदार वर चढू नकोस. वर चढशील तर तुझे राई राई एवढे तुकडे करून टाकीन " असे दरडावून सांगूं लागले. माधवरावाना व इतर मंडळीना फार अचंबा झाला व वाईट वाटले. माधवराव रडू लागले. इतर वेळीं कोणत्याही अवस्थेंत जवळ येऊं देणारे बाबा आज एकाएकी ऐन प्राण जाण्याचें वेळीं इतके निष्ठुर कसे झाले याचा त्यांना उलगडा होईना. महाराजांची लीला महाराजच जाणोत. त्यांनी

" वर चढू नकोस " हा हुकुम अर्थातच सापास दिला. " तुझे राई राई एवढे तुकडे करीन. अशी त्याला भीती घातली. परंतु इतरांना असें कसे समजणार. लोकांनी गळ घातली विनवण्या केल्यावर " याला घरी घेऊन जा असा हुकुम दिला " "अल्ला अच्छा कर देवेगा" असा आशिर्वाद दिला. मंडळी माधवरावना घरी घेऊन गेली. घरी गेल्यावर माधवरावजीना आराम झाला. सापाचे वीष उतरू लागले व दुसरे दिवशीं ते बरे झाले. दोन महिनेपर्यंत त्यांचे साप चावलेले बोट हिरवे निळे दिसत होते. व त्याना पित्ताचा विकार झाला होता.

माधवरावांना मूळव्याधी होती. त्याचा त्याना मधूनमधून फार त्रास होत असे. परंतु त्यावर वरून विटकारीचे टोल्याचा शेक घेणें याशिवाय दुसरा इलाज ते करीत नव्हते हे मला माहीती आहे. स्वतःकरितां कोणतेही औषध ते बाबाना विचारल्या-शिवाय घेत नसत. माधवराव नागपुरास बापुसाहेब बुटीकडे असताना त्यांची मूळ-व्याधी फार वाढली त्यांनी श्रीबाबाना पत्र पाठविले. त्यावेळीं मी शिरडीस बाबांचे जवळ होतो. " त्याला इथे शिरडीस येण्यास सांगा " असे बाबा म्हणाले " मी त्याला किती किती जपतो पण त्याचे × × × लाच होते त्याला मी काय करूं " असे बाबा गंमत करून बोलले. " हिंडायला पाहिजे येथें यायला नको त्याला पत्र पाठवून बोलवा. बरे होईल " असें सांगितले.

तीन चार वर्षापूर्वीपासून माधवरावांना वाताचा विकार झाला. त्यांचे वयही बरेच ( पाऊणशेचे वर ) झाले होते. त्यामुळें त्यांना दीक्षित वाड्याच्या माडीखाली फारसे उतरवत नसे. शक्तीपात झाला होता व हात कापत होते. शरीरधर्माची ताकद राहिली नव्हती. बोलणें मात्र कायम होते. बाबांच्या गोष्टी सांगणें हा त्यांचा व्यवसाय चालूच होता. त्यांना माझे भजन फार आवडत असे. शिरडीस जाणें झाले म्हणजे माधवराव माझेकडून एकदा तरी भजन म्हणवून घेत व माझी वाहवा करीत. आतां आमचे कौतुक कोण करणार ! मला ते वडील माणसाप्रमाणेंच वाटत. चमत्कार हा कीं, ६।७ महिन्यापूर्वीं पासून त्यांची प्रकृति चांगली सुधारली होती. ते पूर्ववत् हिंडूं फिरूं लागलें होते. " बाबानीं एकदां माझेकडे पाहिले " असें ते म्हणत. परवां रामनवमीचे उत्सवाचे वेळी ते मला इतक्या लवकर देह ठेवतील असें वाटले नव्हते. आमचे घरांत दीक्षित वाड्यांत भक्तमंडळीकडे व कमिटीचे सभेकरितां येत असत.

माधवरावजींची प्रज्ञा चांगली होती. पाहणी सूक्ष्म होती. ते एकदां नागपूर-वऱ्हाड प्रांताकडून शिरडीस परत आले. तिसरे प्रहराची वेळ होती. मी शिरडीसच

होतो. द्वारकामाईत प्रथम आल्यावर श्रीबाबांचे दर्शनास आले. आजूबाजूला बरीच मंडळी बसली होती. " का शामराव कोठ कोठ गेला होतास " असें बाबानीं विचारलें. " देवा ! नागपूरकडे गेलो होतो. " अरे शामा नागपूरला गेला होतास तर नागपूरचे दक्षिणेस एक सोन्याचे झाड आहे ते पाहिलेस काय ? " असें बाबानीं विचारिलें. हे ऐकल्यावर माधवरावना, मला (मी नागपूरचाच असल्याकारणानें) एकदम वाटले कीं, हा उल्लेख नागपुरचे सुप्रसिद्ध वली श्रीताजुद्दीन बाबांचा असावा. माधवरावजीनीं चटकन ओळखले व म्हणाले, " होय होय बाबा खरच नागपुरास असतांना मी नागपुरचे दक्षिणेस भोसल्यांचे ( रघोजी–राजे ) बगीच्यांत श्रीताजुद्दीन बाबाचे दर्शनास गेलो होतो. केशवराव भय्यासाहेबांचे बरोबरच त्यांचे गाडींतून गेलो होतो." ( या वेळीं बापुसाहेब बुट्टी शिरडीसच होते. ) " बर मग पुढें कोठें गेला होतास. " माधवराव म्हणाले, " मी नागपुरहून पुढे उमरावतीस गेलो होतो. तेथें बेट केडगांवचें श्रीनारायण महाराजहि आले होते. त्यांचेहि दर्शन घेतलें. " " काय हे देवा हे नारायण महाराजांचे कसे काय आहे त्यांचे दर्शनास कितीतरी मंडळी जातात " हा माधवरावांचा प्रश्न पाहून मला उत्सुकता उत्पन्न झाली. श्रीबाबा यावर काय उत्तर देतील हें ऐकण्याकरितां मी कान टवकारिले. पण बाबा कसले वस्ताद. त्यांनीं प्रथम उत्तरच दिलें नाहीं. माधवरावांनीं पुनः पुनः तेंच तेंच विचारिलें. ५।१० मिनिटांनीं बाबा म्हणाले " असे आहे शामा, आपला बाप तो आपला बाप, त्यानें कितीहि मारलें कितीहि झोडलें, कितीहि तोडले तरी त्याला आपली दया येणार तशी दुसऱ्याला कशी येईल. तुझा बाप मी आहे. तुला दुसऱ्याशीं काय करावयाचें आहे. " माझे फार समाधान झाले. कोणाला दोष दृष्टीनें पाहूं नये. सत्पुरुष म्हणून गणलेल्यांना तर मुळींच दोष देऊन पाहूं नये. तो दोष आपल्या परंपरेला लागतो. ही यात बाबानी फार खुबीने शिकवण दिली. आपले बापाला–गुरूला–भजावें. त्यांचेवर निष्ठा बळकट ठेवावी. व इतर सर्वांना नमूनच असावें हीच माझे बाबांची शिकवण. ते आपले मंडळींना तीर्थाना-यात्रेला-जागृत ज्योतीना पाठवीत. त्यांना बाबानीं कधींही मनाई केली नाहीं. जेथे जेथें ज्या ज्या इष्ट देवतेची ज्याना ज्याना श्रद्धा असे त्याना त्याना त्या त्या

ठिकाणीं जावयास सांगत.

एकदां माझेशीं माधवरावांचा पोथी—पुराणा संबंधानें मोठा वाद झाला. मी इंग्रजी शिकलेला विलायतेहून जाऊन आलेला सर्वांना ठाऊकच होतें. माझा पोथ्या पुराणावर विश्वास बेताबाताचाच असावयाचा हा त्यांनी आपला ग्रहच करून ठेविला होता. द्वारकेंत ५६ कोटि यादव राहात होते कीं काय हा प्रश्न निघाला. माझें म्हणणें कीं याचा निराळा अर्थ करावयास पाहिजे कारण इतकी दाट वस्ती असूनहि आज सबंध हिंदुस्थानांत ३५ कोटि लोक नाहींत ते लहानशा मुंबई एवढ्या द्वारका बेटांत ५६ कोटि यादव कसे राहूं शकतील. वादावर प्रकरण आलें माझा पोथ्या—पुराणावर विश्वासच नाहीं म्हणून मी असें बोलतो असे माधवरावजी बोलूं लागले. शेवटीं ते म्हणाले "तुमचा बाबांचे तरी बोलण्यावर विश्वास आहे ना" "बाबांचे सांगण्यावर माझा पूर्ण विश्वास आहे, ते सांगतील तें खरेंच असणार" असें मी उत्तर दिलें.

आम्ही सर्व मंडळी श्रीबाबांचेकडेस द्वारकामाईत गेलो. माधवरावजींनीं बाबांना सांगितलें "बाबा हा पहा गणपतराव काय म्हणतो. पुराणे खरी आहेत कीं खोटी आहेत ?" बाबा म्हणाले "पुराणे खरी आहेत." त्यांत लिहिलेल्या गोष्टी बरोबर आहेत. "पहा गणपतराव—बाबा काय म्हणतात ते चांगलें ऐका" पुन्हां माधवरावजींनीं बाबांना विचारिलें "बाबा ! श्रीकृष्ण, श्रीरामचंद्र हे खरे आहेत ना" बाबा म्हणाले "होय, ते फार मोठे होते. ते बली होते. ते सर्व खरें आहे" माधवरावांनी ५६ कोटि यादवांचा प्रश्न विचारिलाच नाहीं. त्यांचेंहि समाधान झालें व माझेंहि झालें. श्रीराम हे तर बाबांची उपास्य देवताच होती असा माझा अंदाज आहे. त्यांनी श्रीरामाच्या मूर्ती विकत घेऊन ठेवल्या आहेत. त्या अद्यापि तशाच आहेत. देऊळ बांधून त्या मूर्तींची स्थापना करावी असा कांहीं भक्त मंडळींचा विचार होता परंतु तो काम तसाच राहिला आहे.

माधवरावजींचे निधनाची खबर ऐकून मला त्यांचें संबंधीं माझ्या आठवणी लिहिण्याची इच्छा झाली, त्याप्रमाणें वरील लेख साईलीला मासिकाकरितां तयार केला. आतां याचप्रमाणें श्रीसाईबाबांचें आणखी दुसऱ्याहि साईपदीं लीन झालेल्या श्री. बापुसाहेब बुटी, काकासाहेब दीक्षित, म्हाळसापती सोनार, बाळक रामजी मानकर, तुकाराम, राधाकृष्णबाई, अण्णासाहेब दाभोळकर, अण्णा चिंचणीकर काका महाजनी, नानासाहेब चांदोरकर, तात्या पाटलाची आई, राधाबाई गोणकरीन, काका निमोणकर,

रा. ब. भाऊसाहेब धुमाळ वगैरे भक्तमंडळीसंबंधानेंहि माझ्या आठवणी लिहून काढ-ण्याचा माझा विचार आहे. ह्या संबंधानें श्रीसाईलीला मासिकाचे संपादक यांनीं पूर्ण सहानुभूति दाखविल्यास माझे हातून हें काम पार पडेल अशी उमेद आहे.

ही मनांत योजलेली इच्छा पुरविण्यास श्रीगुरुसाईमाउलीची प्रार्थना करून हा लेख आटोपता घेतो, ह्या लेखमालेला माधव रावजी देशपांडे यांचेपासूनच सुरवात होत आहे हें योग्यच आहे. माधवरावजींना समोर करूनच आम्ही श्रीबाबांकडेस जात होतों. माधवरावजी व इतर बाबांचे भक्त धन्य होत, वर दिलेल्या श्रीतुकाराममहाराजांचे वचनांत सांगितल्याप्रमाणें—तरीच जन्मा यावें ॥ दास विठ्ठलाचे व्हावें—त्यांनीच जन्मास येऊन खरा मार्ग चोखाळण्यास सुरवात केली असें म्हणणें प्राप्त होतें.

साईदास,

गणेश गोविंद नरके.

## ॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

हेतु बरारे ॥ साईचरणींलक्षधरारे ॥ माझा साई तसें म्या व्हावें ॥ मरणावरती राज्य करावें ॥ हेतु बरारे सा. च. ल. ध. ॥ ज्याला गोड जगाचा मान ॥ तो नर होय जगाचा श्वान ॥ कंटकमुगुटासाठीं मान ॥ पुढती करारे ॥सा. च. ल. ध. ॥ कोणी काय म्हणो या साठीं ॥ बळकट प्रेम असावें गांठीं ॥ निंदा स्तुतिवर लावुनि काटी ॥ मी तूं हरारे ॥ सा. च. ल. ध. ॥

॥ २ ॥

मी तों अपराधाच्या राशी ॥ म्हणुनी आलो पाया-पाशीं ॥ आतां पाहिजे तें करी ॥ मला तारी अथवा मारी॥ तूच माझा दीनबंधू ॥ दास म्हणे कृपासिंधू ॥ देवा आतां ऐसें करी ॥ चित्त ठेवी पायावरी॥ देह जावो अथवा राहो ॥ तुझ्या चरणी दृढ भावो ॥ चरण न सोडी सर्वथा ॥ आण तुझी सांईनाथा ॥

॥ ३ ॥

होचि दान देगा देवा ॥ घडो नित्य तुझी सेवा ॥ तुझ्या प्रीत्यर्थ उच्चार ॥ घडो आचार विचार ॥ तुझं लेंकरूं मी देवा ॥ घेई बापासम सेवा ॥ तुझें चिंतन जीवन ॥ न हो कदा विस्मरण ॥ साईदास म्हणे पुरे झाले ॥ साईवैभव हातीं आलें ॥

र. मा. पु.

51

# अनुभव

( श्रीसाईसुधा, मद्रास, वरून अनुवाद.)

## श्री. टी. एस. जंबुनाथ आय्यर, हेडक्लार्क डिस्ट्रिक्ट फॉरेस्ट ऑफिस, कोइमतूर.

खालील दिलेला अनुभव अगदीं नवाच म्हणजे गेल्या वर्षामधील आलेली प्रचिती होय. श्री. बी. व्ही. एन. स्वामी यांचा सन्डे टाईम्स मधील लेख वाचून मला बाबा खरे सत्पुरुष असल्याबद्दल खात्री झाली व साहाजिकच त्यांचेविषयीं आपणांस अधिकाधिक माहिती मिळण्याची उत्कंठा लागली. सुदैवानें गेल्यावर्षी मला मद्रासचे मि. एम. ओ. ( अलसिंग्र चारी ) यांना भेटण्याचा योग आला. आणि ते वापरीत असलेल्या आंगठीवरून मला ते साईभक्त असल्याबद्दल माहिती मिळाली व त्यांजकडून बाबांवरील माहितीचें ग्रंथ व पुस्तकें मी त्यांचेजवळून मिळविली. तेव्हांपासून मी स्वतः व माझे कुटुंबांतील मंडळी श्रीसाईबाबांचें निस्सीम भक्त झालों. इतकेंच नव्हे तर आम्हांस हरएक तऱ्हेनें नेहमींच्या व्यवहारांतसुद्धां बाबांचें अस्तित्व जाणवतें.

### कपाळदुखी बरी झाली.

माझी बायको कपाळ दुखीनें नेहमीं आजारी असे इतकी कीं जवळ जवळ वेड लागण्याची पाळी येई व औषधोपचार करून गूण येण्याचें चिन्हच दिसेना. आम्हीं बाबांचें उदीचे चमत्कार ऐकले होते, त्यांची प्रचिती पहायची म्हणूनच नव्हे तर बाबां-वरील अढळ विश्वास म्हणूनच माझे पत्नीनें बाबाची उदी लावण्यास सुरवात केली. आणि आश्चर्य हें कीं तावडतोब तिचें डोकें दुखणें बंद झालें. व जें १५ दिवसांनें अंतरानें दुखे ते हल्ली फार क्वचित दुखते व दुखण्याची तीव्रता फारच कमी असते. मला खात्री वाटते की बाबांचे कृपेनें थोडासुद्धां त्रास होणार नाहीं. कारण गेल्या चार महिन्यांत तिला डोकेदुखीनें मुळींच त्रास झाला नाहीं.

**(२) भयंकर रोगांतून मुक्तता:**—आमचे शिपायाची बायको क्षयानें गव्हर्मेंट हेडक्वार्टर्स हॉस्पिटलमध्यें आजारी होती. तिची स्थिति फारच चिंताजनक होत गेल्यामुळें शेवटी हॉस्पिटलमधून हालवावी लागली. शेवटी सर्व प्रयत्न करून थकल्यावर आम्ही तिला बाबांची उदी दिली आणि तिला गुण वाटू लागल्याचीं चिन्हें दिसू लागलेली पाहून आम्ही व डॉक्टर्स आश्चर्यानें दिङ्मूढ झालों. आतां ती साफ बरी झाली आहे. श्रीसाईबाबांना नमस्कार असो.

**(३) आवश्यक ठिकाणीं बदली:**—गेल्या आठवड्यांत मी त्रिचीहून कोईमतूरला येत होतो. माझ्या शेजारच्या कंपार्टमेंटमधला मनुष्य अस्वस्थ व वेड्यासारखे चाळे करतांना दिसला. त्याला त्याच्या त्रासाचे कारण विचारलें तेव्हां कळून आलें की, तो एक सरकारी नोकर असून त्याचा मुलगा एका विशिष्ट दुखण्यानें आजारी असून त्याला विशिष्ट ठिकाणीं नेल्यास त्याला बरें वाटण्याचा संभव आहे. अर्थात त्याला आपली बदली त्या विशिष्ट ठिकाणीं करून घ्यावयाची होती. पण तशी मिळेल याबद्दल तो साशंक होता. माझी आंतली भावना स्फूर्त होऊन मीं त्याला सांगितलें कीं तुझी बदली तुला पाहिजे असलेल्या ठिकाणीं होईल. त्याच प्रवासांत मी त्याला श्रीसाईबाबांविषयीं माहिती सांगितली आणि म्हणालो कीं, बाबांचें कृपेनें आपली बदली निश्चित होईल. असें फिरून अश्वासन दिलें.

आम्ही कोईमतूरला आल्यावर त्यानें आणखी कांही दिवसांनीं मला भेटेन म्हणून सांगितलें. दोन दिवसांनी रात्रीं १० वाजतां तो सद्गृहस्थ आमचेकडे आला, व आपणास हवी असल्या ठिकाणीं बदली झाल्याचें सांगितलें. अर्थात् मर्वस्वी हे सर्व बाबांचे कृपेमुळें झाले याबद्दल खात्री पटली.

मला नमूद करण्यास आनंद वाटतो कीं माझ्या मित्रांपैकीं पुष्कळजण बाबांचे भक्त झाले आहेत आणि त्यांना बाबांचे अस्तित्वाची जाणीव होत असते.

**श्रीयुत एम. एस. बी. केसावेहु, सबरजिस्ट्रार, धर्मवर्म, अनंतापुर जिल्हा, यांच्या, साईसंस्थानला धाडलेल्या पत्राचा उतारा:—**

श्रीसाईबाबा सर्व ठिकाणीं असतात व आपल्या भक्ताला त्यांच्या ऋणानुबंधाप्रमाणें सहाय्य करतात. माझ्या कल्याणाचा मार्ग मला श्रीसाईबाबा दाखवितात. श्रीसाईबाबांच्या आज्ञेप्रमाणें मी माझ्या मुलीचें नांव राधाबाई ठेविलें आहे. हल्लीं आई आणि मुलगी दोघीही सुखी आहेत. साईबाबा नेहमीं आमचें रक्षण करतात. मी साईबाबांच्या पूजेकरता ६ रुपये पाठविले आहेत. आपण मला नंतर प्रसाद व उदी पाठवावी.

माझ्या पत्नीच्या प्रसुती समयीं तिला मृत्यूच्या मुखांतून श्रीसाईबाबांनीं वाचविलें. मी त्यावेळीं श्रीसाईबाबांची आळवणी करीत होतों व शेवटीं डॉक्टरच्या साधनाशिवाय श्रीसाईबाबांच्या कृपेनें प्रसुती सुखरुप झाली. जवळ जवळ १३ तासपर्यंत तिला प्रसुती-वेदना होत होत्या. (Sai Sudha July issue )

## सर्पदंशापासून बचाव

श्री. टी. रामनाथ शास्त्रीअर, शास्त्र संजीवनी प्रेस मद्रास, कळवितातः—

ता. १८ मार्च १९४० रोजीं मी कुट्टलम या रेल्वेस्टेशनवर होतों. मला तिरुवल्लरला जाणें जरूर होतें. परन्तु माझ्या भाच्यानें मला अतिशय आग्रह केल्यामुळें मला रहाणें भाग पडलें. येथें मुक्काम करण्यांत बाबांचा कांहीं हेतु नसेल ना असा मनामध्यें सहज प्रश्न डोकावला. त्याच दिवशीं संध्याकाळीं मी एका पोर्टरला बाबांची उदी देत होतों. थोड्यावेळानें हरिजन लोकांचा घोळका एका बेशुद्धावस्थेंत असलेल्या मुलाला घेऊन जातांना आढळून आला. त्याला सर्पदंश झाल्याची शंका मनांत येऊन मी पोर्टरबरोबर बाबांची उदी देऊन त्या मुलाकडे पाठविली व मीहि घाईनें त्याबरोबर निघालों. त्याला औषध वगैरे देण्याचा त्या लोकांचा विचार होता. त्या मुलाची वाचा बंदच झाली होती. व डोळे मिटलेले होते. थोडक्यांतच त्याचें मरण ठेपलें होतें असें आम्हांस वाटलें. मला पाहून त्या हरिजनानी त्या मुलास मजशेजारी आणले.बाबांचे उदीची चिमटी हातांत घेऊन मी त्या मुलाचा जीव वाचविण्याविषयीं बाबांची प्रार्थना केली व उदी त्या मुलाचे कपाळाला लावली. लगेच त्यानें डोळे उघडले व मजकडे पाहिलें. तरीसुद्धां त्याला बोलतां येत नव्हतें. म्हणून थंड पाणी घेऊन त्यांत उदी घातली व तें पाणी शिंपडलें. लगेच. तो उठून बसला व पूर्ण बरा झाला. (S. S. June issue)

## एक मद्रासी भक्त धर्मवरम येथून संस्थान चि. सास कळवितात कीं—

तारीख ११-७-४० रोजीं रात्रीं माझी लहान मुलगी पडशाखोकल्यानें सीक पडून पुढें बरीच कठीण अवस्था झाली. साईबाबांनीं प्रत्येक संकटास आम्हांस मदत केली आहे. सदरहू प्रसंगीं मुलीस गुण पडावा म्हणून मी बाबांचा धावा केला व प्रार्थना केली. बाबांनीं हांक ऐकली व सुमारें अर्ध्यातासांत मुलीला बरें वाटूं लागलें.

223

# शिर्डी–वृत्त

## जुलै १९४०

या महिन्यांत मद्रास, सिकंदराबाद, मालेगांव, पुणें, ठाणें, मुंबई, वांद्रे, सांताक्रुझ, पारलें, चिंचणी, फलटण, संगमनेर, रहिमतपुर, नागपूर, नाशिक, हुसंगाबाद येथून बरीच भक्तमंडळी व सन्माननीय पाहुणे मंडळी श्रीचे दर्शनास येऊन गेली.

मे. अल्मोरा साहेब आय. सी. एस्. नाशिकचे कलेक्टर हे मे. पटेल मालेगांवचे मुनसफ, रा. बा. फोपळे इनामदार व कोपरगांवचे मामलेदार यांसह श्रीचे दर्शनास गु. पौ. चे उत्सवांत दुसरे दिवशीं येऊन संस्थानास भेट देऊन गेले. याच दिवशीं सं. क. व भ. मं. यांच्या सभा असल्यामुळें संस्थानचें विश्वस्त व चिटणासादि कार्यकारी मंडळांच्या त्यांच्या भेटीगांठीं पडून त्यांस संस्थानांतून फिरवून श्रीचे स्मरणनीय स्थलांची माहिती देण्याचा व शिष्टाचारानुरोप आदरातिथ्य संस्थानकडून करण्याचा सुयोग जुळून आला.

( २ ) एकंदर ३९ आभिषेक व सहा अर्चनें श्रीचे समाधीवर भक्तांकडून करविण्यांत आली. श्री. एस. अलसिंगाचार, मद्रास यांचेकडून ५१ पात्रांचें गुळशिऱ्याचें अन्नदान झालें. गलेफ, उपरणी कापड व भांड्याची वहानेंहि श्रीचे समाधीस भक्तांकडून अर्पण करण्यांत आली. त्यांत श्रीसाईदास मंडळ पुणें यांजकडून जरीकाठी उपरणें व श्री. अनुसुयाबाई चौधरी, पुणें यांजकडून पितळी मोठी समई, वजन शेर ७ सातची व श्री. अझीउद्दीन अहमद, मद्रास यांचेकडून चांदीचा पेला वजनभार १२॥ तोळ्याचा आला आहे.

संस्थान गवयाची एकंदर पांच किर्तनें झालीं. व गुरुपौर्णिमा उत्सवांत अक्कलकोटकर बुवांची दोन, व ह. भ. प. विश्राम बुवांची दोन किर्तनें झाली. श्रीगुरुपौर्णिमेचे दिवशीं दोन प्रहरीं रा. सा. यशवंतराव गाळवणकर यांचे श्रीगुरुभक्ति या विषयावर दोन तास सुश्राव असें कीर्तन होऊन भक्तवृंद श्रीचरणी तल्लीन झाला होता. त्याच-

१५५

प्रमाणें पुणें येथील श्री साईदास मंडळाचे चालक रा. नानासाहेब रासने यांचेबरोबर पुणेकर मंडळी आली होती त्यांनीं श्रीपुढें उत्सवांत संगीत भजनाची हजेरी दिली.

(३) यंदाचा हा दुसरा गुरुपौर्णिमेचा उत्सव ज्यास श्रीमंत बुटीसाहेब स्वतः हजर राहिले नाहीत. लागोपाठ असे दोन उत्सव उरकणेंचे घडून आलेमुळें भक्त मंडळांची मनें साशंक होऊन यंदाचे उत्सवांत हा विषय चर्चेचा होऊन राहिला होता. व उघड उघड पुढीलप्रमाणें उद्गार ऐकूं येत होतेः—"असेंच पुढें होणें असल्यास श्रीमंतानीं श्रीचे उत्सव कार्य आपले बतीनें आपले नोकर वर्गाकरवीं उरकणेपेक्षां ते संस्थान कमिटीकडे सोंपविलें असतां जास्त शिस्तवार होईल. कारण अद्याप संस्थान कमिटींत श्रीचे खास व वयोवृद्ध व तपोवृद्ध अशा भक्त मंडळांचा भरणा पुष्कळ आहे व त्यांचेच हस्तें श्रीची पुजा आर्चादिविधी गुरुपौर्णिमेचे सारखे दिवशी होणें श्रीस जास्त प्रिय होईल व शिस्तवारही होईल." असो श्रीमंताच्या पुढील उत्सवाचे अगोदर पूर्ण विचार करून पुढील धोरण ठरविणेचे करतीलच.

(४) संस्थानांत आरोग्यदृष्ट्या व साफसफाईचेकडे संस्थानकडून होत असलेल्या सुधारणा हाही विषय भक्तमंडळाचे चर्चेचा होता. व त्या बाबतींत सर्वत्रांचे समाधान असल्याचें दिसून आलें.

(५) शिरडीची हवा अभ्राच्छादित कुंद अशी असते. व सूर्यदर्शन क्वचितच होते. पावसाची झिम झिम रोज थोडी थोडी असतेच. याच महिन्यांत शिरडी येथील ग्रामस्थांची कै. रा. बा. भाऊसाहेब धुमाळ संस्थानचे एक ट्रस्टी यांच्या निधनानिमित्त दुखोठ्याची सभा झाली. तिचा आलाहिदा रिपोर्ट पुढील अंकीं प्रसिद्ध होईल.

श्री. ना. खारकर,
ऑ. चि.

# संस्थान वृत्त.

## संस्थान कमिटी

गेले ता. १७-४-४० चे सं. क. चे ठ. नं. ४ ने संस्थान कमिटीचे खजिनदार रा. सामंत यांस त्यांचे खजिनदारीचे कामांतून मुक्त करणेंत आलें असोन ठ. नं. ५ नें सं. कं. चे चिटणीस रा. खारकर यांस स्वतःचे काम सांभाळून तूर्त खाजिनदार नेमणेंत आलेले आहे. वरिल योजनेन्वयें नुकतेंच ता. २०-७-४० चे सं. क. चे संस्थेंत रा. सामंत यांनीं ता. २५-८-४० लीं पूर्ण चार्ज सं. कमिटीस देणेचें कबुल केलें आहे.

## भक्तमंडळाचे माहितीकरितां खुलासे.

संस्थानचें चालू ट्रस्टी पैकीं एक ट्रस्टी, कै. रा. बा. सखाराम बळवंत धुमाळ मयत झाल्यामुळें बाकीचे ४ ट्रस्टी यांनीं, संस्थानचें व्यवस्थेकरतां डिस्ट्रिक्ट कोर्ट अहमदनगर यांचेकडून मंजूर असलेले स्कीमचे कलम एक अन्वयें त्यांस अधिकार दिला आहे. त्या अनुरूप, सदरचे ट्रस्टीचे खाली झालेले जागीं, श्री. रा. सा. यशवंत जनार्दन गाळवणकर, संस्थानचे कमिटीचे एक सभासद, यांची नेमणूक एक मतानें केले वरून, सदरचे नेमणुकीस महरबान डिस्ट्रिक्ट जज अहमदनगर यांची स्कीम प्रमाणें मंजुरी लागते ती संस्थान कमिटीनें मागविलेवरून त्या कोर्टानें आपले नं. १८८४ ता. ऑगष्ट १९४० चे हुकूम पत्रकानें दिली आहे. कळावें.

३७, वराई रोड, ठाणें
ता. ८ ऑगस्ट, १९४०

श्री. ना. खारकर,
ऑ. चिटणीस,
श्रीसाईबाबा शिरडी संस्थान

## चुकीची दुरुस्ती.

(१) गेले आषाढ महिन्याचे अंकांत पान १९७ वर श्रीरामनवमीचे जमाखर्चाचा तपशील छापला आहे त्यांत खर्चाचें तपशीलाखालीं श्री. दासगणुंचे मार्फतचा आकडा ११९३–१४–६ चे ऐवजीं २११२–१४–६ असा चुकून छापला गेला आहे.

(१) खालील भक्तांकडून शके १८६० चे श्रीसाईबाबांचे पुण्यतिथीकरितां दुय्यम खजिन दार यांजकडे आलेले पैसे संस्थानचे खाजिनदार यास दिले गेले व ते त्यांचेकडून संस्थानास जमा झाले पण तीं नांवें नजर चुकीनें प्रसिद्ध करणेचे त्यांजकडून राहून गेले.

श्री. धुंडीराज रामकृष्ण सांखळकर, माहिम १-४-०
श्री. भिकाजी नारायण केळकर, माहिम १-४-०
सौ. अन्नपूर्णाबाई शंकर तेंडुलकर, अलिबाग १-४-०
श्री. दिनकर महादेव जुवळे, दादर १-४-०

संपादक.

१४५

# भक्तमंडळाच्या सभेचें टिपण

श्रीसाईबाबा शिरडी संस्थानचे भक्त मंडळाची १८ वी, शके १८६१ ची वार्षिक सभा, तारीख २०-७-१९४० शनिवार रोजीं सायंकाळीं साडेचार वाजतां शिरडी येथें दिक्षित वाड्यांत भरली होती. त्या सभेचें टिपण:—

## हजर असलेले सभासदांचीं नांवें.

१. रा. ब. मो. वि. प्रधान.
२. रा. रा. श्री. ना. खारकर.
३. रा. रा. रा. रा. सामंत.
४. रा. रा. र. भा. पुरंदरे.
५. रा. रा. व. ना. गोरक्षकर.
६. रा. रा. गो. का. गाडगीळ, बॅरिस्टर.
७. रा. रा. विष्णू गो. देव.
८. रा. रा. दा. वि. सांबारे.
९. रा. सा. य. ज. गाळवणकर.
१०. रा. रा. तात्याजी गणपत पाटील, कोते
११. सौ. लक्ष्मीबाई गो. गाडगीळ.

संस्थानचे सन्माननीय ऑडिटर, पल्लेकर आणि कंपनीचे रा. वरेरकर, हेही मंडळाचे खास विनंतीस मान देऊन सभेचे वेळीं हजर होते.

रा. रा. सामंत यांचे सुचनेस रा. रा. सांबारे यांनीं अनुमोदन दिलें. रा. बा. मो. वि. प्रधान यांची अध्यक्षांचे जागीं निवड होऊन प्रधान यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलेवर सभेचे कामास सुरवात झाली.

अॅ. क. १

ठ. नं. १. शके १८६० साल्च्या संस्थानच्या हिशेबाचें आढावापत्रक जे संस्थानचे सन्माननीय हिशेब तपासनीसांनीं तपासून दिलेले आहे व जे संस्थान कमिटीनें मंजूर केलेलें आहे ते या सभेपुढें सं. क. कडून मंजुरीकरितां मांडलेवरून ही सभा ते मंजूर करिते.

ठराव मांडणार:—रा. दा. वि. सांबारे व अनुमोदन देणार:— रा. विष्णुपंत

सर्वानुमतें मंजूर

बा.

-४-३८ ते ३१-३-३९ पर्यंतचा जमाखर्चाचा तक्ता.

| खर्च | रु. | आ. | पै |
|---|---|---|---|
| श्री पूजा | १२८ | ३ | ० |
| ,, नैवेद्य | २६७ | ० | ० |
| ,, रोषनाई | २१६ | १२ | ० |
| ,, पगार | ११८२ | २ | ६ |
| ,, घोडा | १४४ | ४ | ६ |
| ,, दक्षिणा | ३४५ | ० | ० |
| ,, धुनी | ७१ | ० | ० |
| ,, लेंडीबाग | २४९ | ३ | ९ |
| ,, धर्मादाय | ३१ | १४ | ३ |
| ,, भक्त धर्मकृत्य | १७७ | ९ | ३ |
| कपाटें दुरुस्ती | ४५ | ० | ० |
| कांसव पादुका स्थापना | ७ | २ | ० |
| ऑ. चिटणीस कपाट | ४३ | ८ | ० |
| वाचनालय | १४ | ९ | ० |
| चावडी बांधणे | १९५५ | ८ | ३ |
| सभामंडप स्वयंपाकघर पत्रें | ३३२ | ७ | ६ |
| सभामंडप स्वयंपाकघर झडपें | १६७ | ९ | ० |
| किरकोळ दुरुस्ती | ९१ | ८ | ० |
| सिंव्हासन | २३० | ४ | ० |
| ताटवाटया मजुरी | ३९ | ० | ६ |
| कोठी | ४५ | ४ | ० |
| किरकोळ | १०९ | १० | ० |
| फोटो खरेदी | ६ | १२ | ० |
| इस्टेट खरेदी | २ | ११ | ० |
| कोर्ट खर्च | १८२ | ६ | ० |
| स्टँप खरेदी | २२ | ८ | ० |
| I, चिटणीस ऑफीस खर्च | १५६ | ३ | ० |
| प्रवास खर्च | ५० | ६ | ९ |
| पोस्टेज | १०८ | ६ | ३ |
| स्टेशनरी | १५ | ० | ० |
| श्री साईलीला | ५७४ | १५ | ३ |
| | ७०३३ | ३ | ९ |

## श्री साईबाबा

श्री साईबाबा शिरडी संस्थानचा शके १८६०

| जमा | रु. | आ. | पै | रु. | आ. | पै |
|---|---|---|---|---|---|---|
| मागील पानावरून | ४३८९ | ७ | ३ | ४२८१७ | १२ | २ |
| पोस्टेज व स्टेशनरी | ६ | ८ | ० | | | |
| फोटो विक्री | २० | ९ | ० | | | |
| डिव्हीडंट | ५ | १४ | ० | | | |
| व्याज | १८४२ | २ | ० | | | |
| कै. चित्रणकर ट्रस्ट | ३७३७ | १५ | ९ | | | |
| श्री साईलीला | २७७ | ३ | ० | | | |
| ,, श्रीसाईसच्चरित | २६ | १२ | ३ | | | |
| ,, सगुणोपासना | १९ | १० | ० | | | |
| ,, प्रधान पुस्तक | ४१ | ५ | ४ | | | |
| ,, भक्तलीलामृत | ५ | ८ | ० | | | |
| ,, दत्तजयंती | १ | ० | ० | | | |
| ,, गोकुळ अष्टमी | ८ | ५ | ० | | | |
| ,, पुण्यतीर्थ कोजागिरी १८६० | ७२५ | १५ | ३ | | | |
| ,, गुरुपौर्णिमा १८६० | ३२४ | ६ | ० | | | |
| ,, गुरुपौर्णिमा १८६१ | १० | ० | ० | | | |
| ,, रामनवमी १८६० | ३१५ | ८ | ३ | | | |
| ,, रामनवमी १८६१ | ३०९ | ९ | ० | | | |
| इतर जमा | ३ | १५ | ० | १२४४१ | ९ | ४ |
| | | | | ५५२५९ | ५ | ६ |

१–४–३८ ते ३१–३–३९. पर्यंतचा जमाखर्चाचा तक्ता

| खर्च | रु. | आ. | पै |
| --- | --- | --- | --- |
| मागील पानावरून | ७०१३ | ३ | ९ |
| श्री. सचारिन | ३७७ | १४ | ० |
| ,, केकावळी | १८ | १२ | ० |
| बँक किरकोळ खर्च | ० | १४ | ० |
| गोकुळ अष्टमी | ३१ | ५ | ० |
| बुटी थाळा रिपेअर्स | १३ | २ | ० |
| पुण्यतिथि १८६० | ६७४ | २ | ९ |
| गुरु पौर्णिमा ,, | ३२७ | ५ | ० |
| रामनवमी ,, | ३२० | ७ | ० |
| रामनवमी १८६१ | २३५ | १३ | ९ |
| श्री टिळक १९३९ मार्च अखेर कै. तर्खड मार्फत खजिनदार यांचे हाती | ५०९२ | ० | १० |
| इंपीरियल बँक चालू खाती १५४-१४-८ | | | |
| ,, ,, सेव्हिंग ,, २०-१-० | | | |
| पोस्टल सेव्हिंग ,, ५-०-० | | | |
| श्री. नामंल स. यांचे हाती ३३४ १२-० | १७९ | १५ | ८ |
| ,, खारकर चि. ,, ,, ३५२-५-३ | | | |
| ,, पुरंदरे द. चि. ,, ,, ९९-८-६ | | | |
| ,, देव विश्वास ,, ,, ९३-१-० | | | |
| ,, बाळा गुरव शि. येथे ,, ,, १९८-१४-६ | १०७४ | ९ | ३ |
| मागील सिक्यूरिटीज स्टॉक केलेल्या द. किं. ५३,२०० | ३७१२३ | १५ | ८ |
| चालू साली ,, ,, ,, ३,९०० | २६०७५ | १२ | १० |
| मराठा प्रॉ. फं. २ शेअर्स | १०० | ० | ० |

Examined and found correct.

The Bank Balances & safe custody Recei
certificates of the Maratha P. Fund were ver

Bombay
Dt 20-5-1940

Sd. J. K. Par.
Hon. Au

## List of books about Shri Sai Baba.

——:o:——

Mras books available at Sai Samsthan, Shirdi, P. O. Rahata, st. Ahmednagar and with:—

Rao Saheb B. Papaiya Chetty, 55, Stroten Muthia Mudail Street, Madras.

Introduction to Shri Sai Baba by B. V. N. Swami

| | | |
|---|---|---|
| English, Malayalam, Tamil, Telugu, Canarese & Urdu | | 0–2–0 |
| Experiences of Devotees of Shri Sai Baba by B. V. N. Swami (English) part 1 | ... | 0–4–0 |
| " " " 2 | ... | 0–4–0 |
| " " (in Tamil) Part 1 | ... | 0–4–0 |
| Ma as Devotee's Experiences (English) ... | ... | 0–3–0 |
| Th above three English books bound in half calico | ... | 0–12–0 |
| " " " " in wrapper | ... | 0–10–0 |
| I amawali (i. e. 108 names of Sai Baba) In Sanskrit, T ugu, Tamil, Malayalam, Canarese. each ... | ... | 0–0–6 |
| Leela (in Telugu) by Rao Saheb B. Papaiya Chettiar. | | 0–8–0 |
| Stava (") by Satavadani Doma Venkatswamy Gupta. | | 0–2–0 |
| i Sadgeeta (Tamil) songs set to music by Sow. S. Rajam | | 0–1–0 |
| i Sangita Kirtan (") by Sow Amritam ... | ... | 0–1–0 |
| i Pooja Vidhi in Tamil for Sanskrit ... | ... | 0–1–0 |
| ai Manasa Pooja (Sanskrit) ... ... ... | .. | 0–1–0 |

Gujrathi:—

" Guru Smriti, " " Manache Shloka " & " Hari Path " write to Mr. Wamanrao Prangovind Patel, Head master, Society School, Umreth Dist. Kaira.

Coloured pictures of Sai Baba:—

write to Mr. D. V. Sambare, Tejpal Road, Vile–Parle and to Rao Saheb B. P. Chetty, 55 Strothen Muthi Mudali Street, Madras.

r lockets of Baba:—

Write to 1 A. S. Gopalakrishnan, West Boulevard Road, richinopoly

2 R. Vanchinatha Iyer, 30 Neeli Veeraswami Chetty , Triplicane, Madras.

150